## आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्तविभाग
## राष्ट्रीय बातमीपत्र
## सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:25.05.2025** **वारः रविवार**

---

### ठळक बातम्या

1. आत्मनिर्भरते कडून विकसित भारताचं लक्ष गाठण्यासाठी 'ऑपरेशन सिंदूर' प्रमाणे ताकद दाखववी, पंतप्रधानांच प्रतिपादन
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मन की बात कार्यक्रमातून साधणार देशवासीयांसी संवाद
3. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर २०२४-२५ करिता ८ पूर्णांक २५ टक्के व्याजदर मंजूर

आणि

4. नैऋत्य मान्सूनचा भारतीय उपखंडात प्रवेश

### नीती आयोग

नीती आयोगाच्या संचालन समितीच्या, काल नवी दिल्लीतील झालेल्या बैठकीत, सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी, एकमताने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सशस्त्र दलांना केलेल्या कामगिरीची प्रशंसा आणि समर्थन केल आहे. काल संध्याकाळी माध्यमांना माहिती देताना, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी BVR सुभ्रमण्यम म्हणाले की, प्रत्येकान संरक्षण दलांची भूमिका आणि साहस तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदींच नेतृत्व यांचे कौतुक केले असून आत्मनिर्भर भारता कडून विकसित भारताचं लक्ष गाठण्यासाठी 'टीम इंडियाची 'ऑपरेशन सिंदूर' प्रमाणे ताकद दिसण्याची गरज पंतप्रधानांनी बैठकीत व्यक्त केली. सुभ्रमण्यम म्हणाले की ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपैकी ३१ ने निती आयोगाच्या शासकीय परिषदेत भाग घेतला. हे निती आयोगाच्या शासकीय परिषदेतले सर्वाधिक सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या बैठकीत बोलताना, राज्यांना केंद्र सरकारद्वारे निधी दिलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची विनंती केली. तसंच जागतिक मानकांच्या तुलनेत, किमान एक पर्यटन स्थळ विकसित करण्याला आणि सर्व सुविधा तसंच पायाभूत सुविधांची व्यवस्था निर्माण करण्यास सांगितल

### मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमात देशातील नागरिकांशी संवाद साधतील. हा मासिक रेडिओ कार्यक्रमातीचा 122 वा भाग असेल.

हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन तसंच AIR न्यूज वेबसाइट आणि न्यूज ऑन एयर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. यु-ट्यूबवरील AIR न्यूज, DD न्यूज, PMO आणि माहिती

प्रसारण मंत्रालयाच्या चॅनेलवरही थेट प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित होईल.

**EPFO**

केंद्र सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी EPF कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर ८.२५ टक्के व्याजदर मंजूर केला आहे. याचा फायदा भारतातील ७ कोटींहून अधिक पगारदार कर्मचाऱ्यांना होणर आहे. या वर्षाच्या सुरुवातीला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाने या दराची शिफारस केली होती. २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून मंजूर केलेला दर अपरिवर्तित राहिला आहे, तर २०२२-२३ मध्ये तो ८.१५ टक्के होता. EPFO ने चालू आर्थिक वर्षात ६ मार्च २०२५ पर्यंत विक्रमी २ कोटी १६ लाख रुपये ऑटो-क्लेम सेटलमेंट करून लक्षणीय कामगिरी केली आहे.

**प्रतिनिधी मंडळ**

सर्वपक्षीय संसदीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व करणारे जनता दल संयुक्तचे खासदार संजय झा, काल संध्याकाळी टोकियोतून सियोल, दक्षिण कोरिया येथे पोहोचले, ऑपरेशन सिंदूरच्या महत्त्वावर या क्षेत्रातील देशांसोबत भारताच्या संपर्काचा हा  भाग आहे. द्रविड मुननेत्र कळघमच्या खासदार कणिमोळीच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळान, काल रशियामधील भारतीय दूतावासात सामूहिक पत्रकार परिषद घेतली. कणिमोळीने यांनी ठामपणे सांगितले की पहलगाम दहशतवादी हल्ला पाकिस्तानातून भारतीय भूमीत प्रवेश केलेल्या दहशतवाद्याकडून करण्यात आला. त्यावर भारताने जबाबदारीने प्रतिसाद दिला त्याचा कोणत्याही नागरिकांवर परिणाम झालेला नाही.

**निवडणूक आयोग**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल निवडणूक आयोगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकीलांच्या राष्ट्रीय परिषदेला नवी दिल्लीत सुरुवात केली. सर्वोच्च आणि देशभरातील २८ उच्च न्यायालयामधील वरिष्ठ वकिलांचा त्यात  समावेश असून सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशच्या आयोगाच्या प्रमुखांचा  सहभाग परिषदेत होता. या उपक्रमाचे उद्दिष्ट आयोगाच्या घटनात्मक चौकटीला बळकट करण आणि  आकार देण असून विशेषतः निवडणूक कायद्यासंबंधी, न्यायालयीन प्रक्रिया आणि कायदेशीर सुधारणा यासंबंधीच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

**ब्रीक्स**

उद्यापासून ब्राझीलमध्ये ब्रिक्स देशांच्या संस्कृती मंत्र्यांच्या बैठकीला सुरुवात होणार आहे. या उच्चस्तरीय कार्यक्रमात संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार आहेत. या बैठकीत ब्रिक्स राष्ट्रांचे अर्थात ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका संस्कृती मंत्र्यांना एकत्र आणून परस्पर संबंधाना आणि सांस्कृतिक सहकार्याला

प्रोत्साहन दिले जाईल. या वर्षी संयुक्त सांस्कृतिक प्रकल्प, संस्थात्मक भागीदारी आणि ब्रिक्स देशांच्या विविध वारशाचे जतन करण्याच्या प्रयत्नांद्वारे संबंध मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

**धाड**

डिजिटल अटकेची धमकी देऊन, अमेरिकेतील नागरिकांकडून दररोज लाखो रुपये उकळणाऱ्या, पुण्यातील खराडी इथल्या कॉल सेंटरच्या टोळीला पोलिसांनी उघडकीला आणलं आहे. याठिकाणी कार्यरत शंभरहून अधिक बहुतांश परराज्यातील कर्मचारी रोज लाखो अमेरिकी नागरिकांना कॉल करत होते, असं पोलिस तपासात आढळून आलं. तुमच्या खात्यातून अमली पदार्थांचे व्यवहार झाले आहेत, त्यामुळं तुम्हाला अटक केली जाऊ शकते, अशी भिती घालून दररोज ३० ते ४० हजार डॉलर्स म्हणजे अंदाजे ३२ लाख रुपये या नागरिकांकडून ही टोळी उकळत होती.

**नैऋत्य मान्सून**

या वर्षी नैऋत्य मान्सूनने भारतीय उपखंडात लवकर प्रवेश केला आहे, तो केरळमध्ये काल म्हणजे १ जूनला होणाऱ्या त्याच्या सामान्य आगमनाच्या आठ दिवस आधी पोहोचल्याचं भारतीय हवामान विभागानं सांगितलं. काय आहेत त्यामागील कारणं, एक वृत्तांत...

*V/C*

*यापूर्वी २००९ मध्ये, २३ मे रोजी मॉन्सून केरळमध्ये दाखल झाला होता.  यावर्षी लवकर येण्याच्या कारणांची मीमांसा हवामान विभागानं केली आहे. तीन प्राथमिक निर्देशकांच्या आधारे केरळमध्ये मान्सूनचे आगमन घोषित केलं जातं: सलग दोन दिवस किमान १४ हवामान केंद्रांवर किमान अडीच मिलिमीटर पाऊस, ६०० हेक्टोपास्कलपर्यंत पसरलेले खोल पश्चिमेकडील वारे आणि २०० वॅट प्रति चौरस मीटरपेक्षा कमी लांबीच्या लाँगवेव्ह रेडिएशन मूल्यांमध्ये घट हे ते निर्देशांक आहेत. कोकण-गोवा किनाऱ्यावरील एक स्पष्ट कमी दाबाचा पट्टा शनिवारी कमी दाबाच्या पट्ट्यात तीव्र झाला आणि तो रायगडजवळ धडकण्याची अपेक्षा आहे. अरबी समुद्रात आधीच वादळी वारे आणि जोरदार मान्सूनचे प्रवाह वाहत होते. या वर्षी, हवामान विभागानं पाऊस "सामान्यपेक्षा जास्त" असण्याचा अंदाज वर्तवला आहे, म्हणजे ८८० मिलिमीटरच्या दीर्घकालीन सरासरीच्या १०५ टक्के असण्याचा अंदाज आहे. दोन प्रमुख सागरी प्रभाव - एल निनो-दक्षिणी दोलन आणि हिंद महासागर द्विध्रुवीय प्रभाव सध्या तटस्थ अवस्थेत आहेत, परिणामी मान्सूनच्या हालचालीला पाठबळ मिळण्याची शक्यता आहे. २९ मे ते ४ जून दरम्यान मान्सून दक्षिण द्वीपकल्पीय आणि ईशान्य भारतातील उर्वरित भागांसह पूर्व आणि मध्य भारतातील अतिरिक्त भागात पुढे जाण्याचा अंदाज आहे. मॉन्सूनची लवकर सुरुवात देशभरातील शेती, जलसंपदा आणि आर्थिक स्थिरतेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या चार महिन्यांच्या पावसाळी हंगामाच्या सुरुवातीचा संकेत आहे.*

*आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.*

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट बोर्ड अर्थात BCCIनं पुढच्या महिन्यात होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या क्रिकेट कसोटी मालिकेसाठी काल संघाची घोषणा केली. शुभमन गिलला भारतीय संघाचा कसोटी कर्णधार म्हणून, तर ऋषभ पंत यांची कसोटी उपकर्णधार म्हणून निवड झाली आहे.

**टेनिस**

सर्बियन टेनिसपटू नोवाक जोकोविचने १०० एटीपी टूर जेतेपदे गाठणारा तिसरा खेळाडू बनून इतिहास रचला आहे. काल स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या जिनेव्हा ओपनच्या अंतिम फेरीत जोकोविचने ह्युबर्ट हुर्काझचा ५-७, ७-६, ७-६ असा पराभव करून हा टप्पा गाठला. या विजयासह जोकोविचने जिमी कॉनर्स आणि रॉजर फेडरर यांची बरोबरी केली आहे.

खेलो इंडिया - सी. चो. (८.३८.३० पासून...)

**दीव दमन**

दीव दमन समुद्रकिनाऱ्यावर पहिली खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेत काल पाचव्या दिवशी महाराष्ट्राच्या संघाने पेंचक सिलट प्रकारात ३ सुवर्ण, ४ रौप्य आणि ५ कास्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करत उपविजेतेपद पटकावले. या प्रकारात महाराष्ट्राच्या अंशुल कांबळेने रौप्यपदक जिंकले. बीच सॉकरमध्ये महाराष्ट्र पुरुष संघाने कास्यपदक मिळवले.पदक तक्यात ५ सुवर्ण, ५ रौप्य, १० कास्य अशी २० पदके जिंकून महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल दिल्ली डेअर डेव्हिल्सने किंग्ज इलेव्हनचा ६ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने श्रेयस अय्यरच्या ५३ आणि मार्कोस स्टॉयनीसच्या १६ चेंडूतील ४४ धावांच्या जोरावर २०६ धावा केल्या. दिल्लीने सामनावीर समीर रिझवीच्या २५ चेंडूतील नाबाद ५८ धावांच्या जोरावर हे आव्हान ३ चेंडू राखून पार केलं. आज गुजरात टायटन्सचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी होईल. तर सनरायझर्स हैदराबादचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होईल.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार!